**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे कार्यालय**
**कॅम्प, अमरावती - 444 602**
कार्यालयीन दूरध्वनी 2662090 / 2662593. 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
वनसंपर्क दुरध्वनी (नि:शुल्क) 155314 (फक्त लँड लाईन वरुन संपर्कासाठी)
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in / aticcfa@gmail.com

लेखा (ब)
28/12/2016

वन संरक्षक
कार्य आयोजना विभाग,
अमरावती यांचे कार्यालय
आवक क्रमांक 457
दिनांक 29.12.16

# परिपत्रक

वन संरक्षक कार्य आयोजना
अमरावती
28/12/2016

**विषय :- वन विभागातील वनपाल आणि वनरक्षक यांच्या पर्यवेक्षकीय जबाबदा-या (Supervisory Responsibility)**

१. वन विभागातील गट क संवर्गात असलेल्या वनपाल व वनरक्षक या शासकीय सेवकांच्या जबाबदा-या महाराष्ट्र वन मॅन्युअल भाग-१ मध्ये विषद करण्यात आलेल्या आहेत. भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार उक्त शासकीय सेवकांना वन अधिकारी म्हणूनही प्राधिकृत करण्यात आले आहेत. तसेच या अधिनियमाखाली मालमत्ता जप्त करणे, आरोपीस अटक करणे, गुन्हयांचा तपास करणे तसेच गुन्हा घडूनये इत्यादी वैधानिक शक्तीही उक्त वन अधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

२. वन विभागात रोपवन, वनीकरण तसेच इतर वनविकासांची कामे करण्याकरिता प्रामुख्याने हंगामी पध्दतीने मजूर लावून करण्यात येते. वन विभागात गट ड संवर्गाखाली अधिसंख्य वनमजूर कार्यरत आहेत. वनीकरणविषयक उक्त सर्व कामे विहित पध्दती आणि मापदंडानुसार होण्याचे दृष्टीने वनरक्षक आणि वनपाल दर्जाच्या शासकीय सेवकांकडून मजूरामार्फत होत असलेल्या कामांवर देखरेख व सनियंत्रण ठेवल्या जाते. वनपाल आणि वनरक्षक यांना त्यांचेकडे असलेल्या वैधानिक शक्ती व्यतिरिक्त उक्त पर्यवेक्षकीय जबाबदा-याबाबतही **(Supervisory Responsibility)** जाणीव व्हावी, यादृष्टीने वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी प्राप्त झालेल्या निर्देशाव्दारे पुर्नउच्चार करण्यात येऊन त्यांचेकडे असलेल्या उक्त स्वरुपांच्या जबाबदा-यांबाबत खालीलप्रमाणे विषद करण्यात येत आहे.

३. **वनरक्षकांच्या पर्यवेक्षकीय जबाबदा-या** :

**(Supervisory Responsibilities of Forest Guards)**

३.१) रोपवन, रोपवाटीका तसेच जल मृद संधारणातंर्गत कामावर लावण्यात आलेले हंगामी मजूर इत्यादी उक्त कामे विहित मापदंडानुसार करतात किंवा कसे, यावर सनियंत्रण ठेवणे.

३.२) मजूरांनी केलेल्या कामाचे विहित निकषानुसार मोजमाप घेणे.

३.३) मजूरांनी केलेल्या कामांच्या मोबदल्यात त्यांना देय असलेली मजूरी इत्यादीची परिगणना करुन वरिष्ठांना सादर करणे.

३.४) उक्त कामे विहित आर्थिक तरतूदीच्या मर्यादेत पालन होते किंवा कसे यावर सनियंत्रण ठेवणे.

३.५) अधिसंख्य वन मजूरांची हजेरी घेणे तसेच अनधिकृतरित्या अनुपस्थित असलेल्या मजूरांना कारणे दाखवा नोटीस बजावणे व त्यांचे स्पष्टीकरण प्राप्त करुन अभिप्रायासह वरिष्ठांना त्याबाबतचा अहवाल सादर करणे.

३.६) कामावर अनधिकृतरित्या अनुपस्थित राहिलेल्या अधिसंख्य वन मजूरांना लेखी ताकीद देणे.

३.७) स्वत:चे कार्यक्षेत्रात असलेल्या वनहद्दीची दुरुस्ती आणि देखभाल करणे.

३.८) स्वत:चे कार्यक्षेत्रात असलेले वनविश्रामगृह, शासकीय इमारती इत्यादी सुस्थितीत राहील यावर सनियंत्रण ठेवणे तसेच अशा इमारतीची दुरुस्ती किंवा डागडूजीची आवश्यकता असेल तर त्याबाबतचा अहवाल निकटचे वरिष्ठांना सादर करणे.

४. **वनपालांच्या पर्यवेक्षकीय जबाबदा-या** :

**(Supervisory Responsibilities of Foresters)**

४.१) स्वत:चे प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वनरक्षकांवर वर नमूद केलेल्या जबाबदारीबाबत त्यांचेकडून अपेक्षित कर्तव्य चोखपणे बजावतात किंवा कसे यावर सनिंत्रण ठेवणे.

४.२) एखादा वनरक्षक उक्तप्रमाणे त्यांचेवर सोपविलेल्या जबाबदा-या तसेच त्यांचेकडे असलेल्या इतर वैधानिक जबाबदा-याचा ते काळजीपूर्वक निर्वाह करीत नसेल तर अशा वनरक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावून व त्याचा खुलासा प्राप्त करुन घेणे आणि अशाप्रकारे प्राप्त झालेल्या खुलाशावर त्यांनी स्वत:चे अभिमत नोंदवून वरिष्ठांना अवगत करणे.

४.३) स्वत:चे कार्यक्षेत्रात असलेली रोपवने, रोपवाटीका तसेच इतर वनविषयक कामासंदर्भात वनरक्षकांनी केलेल्या तपासणी इत्यादीची शहानिशा करणे.

४.४) स्वत:चे कार्यक्षेत्रात असलेल्या हंगामी मजूर तसेच अधिसंख्य वनमजूरांद्वारे होत असलेली कामे विहित मापदंडानुसार तसेच विहित आर्थिक तरतूदीनुसार होत असल्याची खात्री करणे.

४.५) एखादा अधिसंख्य मजूर किंवा हंगामी मजूराकडून कामात निष्काळजीपणा बाळगल्या जात असेल तर अशा मजूराला कारणे दाखवा नोटीस बजाविणे, तसेच त्यांचेकडून उक्त नोटीसीवर खुलासा प्राप्त करुन घेणे व प्राप्त खुलाशावर त्यांनी त्यांचे अभिमत नोंदवून वरिष्ठांना सादर करणे.

५. वनपाल व वनरक्षक यांचेवर असलेल्या उपरोल्लेखित जबाबदा-या, त्यांचेकडून अपेक्षित कामासंदर्भात वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशांचे पुर्नउच्चार करण्याचेदृष्टीने नमूद करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र वन मॅन्युअल भाग-१ भारतीय वन अधिनियम, १९२७ आणि वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ तसेच अंमलात असलेल्या इतर कायद्यांमध्ये वनरक्षक, वनपाल या नात्याने त्यांचेवर असलेल्या वैधानिक जबाबदा-यांचे निर्वाहन उक्त जबाबदा-यांव्यतिरिक्त राहतील.

स्वा/-
**(संजीव गौड)**
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती

**क्रमांक मुवसंप्रा/कक्ष-८/आस्था/परि./२६७१/२०१६-१७**
**अमरावती दि. २६-१२-२०१६**
**प्रति,**
**उप वनसरक्षक, अमरावती/बुलडाणा/पूर्व मेळघाट/पश्चिम मेळघाट.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व सहाय्यक वनसंरक्षक.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व वनपाल आणि वनरक्षक.**
प्रतिलिपी :-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य,नागपूर
प्रतिलिपी :-मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
प्रतिलिपी :-वनसंरक्षक, कार्य आयोजना विभाग, अमरावती.
प्रतिलिपी :-वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त,अमरावती.

26/12/16
**(संजीव गौड)**
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती